महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/ 3580 दिनांक : 07/12/2021

**अत्यंत महत्वाचे/अतितात्काळ/ई-मेलद्वारे**

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित,
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय: - डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजने अंतर्गत अर्जाची शहानिशा करणेबाबत...
संदर्भ : - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुबई (कार्यासन क्र. १८) यांचा दि. ०७/१२/२०२१ रोजीचा ईमेल.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या अनुषंगाने राज्यात लागू असलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत औरंगाबाद विभागातर्गत संस्थांमधील वसतीगृहांचा वापर विद्यार्थ्यांकडून झालेला आहे किंवा कसे तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजने अंतर्गत आपल्या संस्थेतील सदर अर्जदार विद्यार्थी टाळेबंदीच्या कालावधीत शिक्षणासाठी वसतिगृह किंवा अन्य ठिकाणी संबंधित शैक्षणिक वर्षात राहत होते किंवा कसे याबाबत प्रत्यक्ष शहानिशा करण्यासाठी आपल्या संस्थेतील डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेसाठी आपल्या संस्थेने यापुर्वी approve (मान्य) करुन पाठविलेल्या अर्जातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष वास्तव्या संबंधीची शहनिशा करुन सदर अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या (पुनर्पडताळणी) प्रपत्रात दि. ०९/१२/२०२१ पर्यंत ईमेलद्वारे (roaurangabad@dtemaharashtra.gov.in) या कार्यालयास हार्ड व सॉफट कॉपीमध्ये पाठविण्यात यावी. सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ प्रादुर्भावामुळे व वारंवार होणाऱ्या Lockdown मुळे अनेक विद्यार्थी वसतिगृहात रहात नसतांना देखील या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला होता व कालांतराने असे विद्यार्थी या योजनेसाठी खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आले असल्यामूळे आपल्या स्तरावर काटेकोरपणे तपासणी करुन माहिती सादर करण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची आहे, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

सोबत:- प्रपत्र

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

Regional office -

Reverified -List of students under DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna 2020-21

| Sr.No. | Inst code | Institute Name | DBT Application no. | Name of student Applied for Dr. Panjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta | Stayed in Institute/ Private Accomodation/ None | Number of months of stay in Institute Hostel/Private Accomodation | Recommended / Non Recommended for Allowance |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |